## मोटार अपघात दावा अर्ज क्र.१४६/२०१९ मधील नि.६ खालील आदेश

CNR No. MHST01-001790-2019

अर्जदार यांनी नुकसान भरपाई मिळण्यासाठी मोटार वाहन कायदा १९८८ चे कलम १६६ नुसार केलेल्या मुख्य अर्जात या अर्जाद्वारे त्या अधिनियमाखालील कलम १४० नुसार अंतरिम नुकसान भरपाई मिळण्याची मागणी केलेली आहे.

२. अर्जदाराचे कथनानुसार दि.०१.११.२०१८ रोजी सायंकाळी ०७.३० वाजताचे सुमारास अर्जदार क्र.१ व २ यांचा मुलगा मयत गौरव सुभाष गाडेकर हा विटा–कराड रस्त्याने रिटस् कार क्र.एम.एच.११/बी.एच.३३२७ ने प्रवास करत असताना मौजे राजमाची, ता.कराड, जि. सातारा गांवचे हद्दीत एस.टी. बस क्र.एम.एच.१४/बी.टी.२४९० ही तिचे चालकाने निष्काळजीपणे, भरधाव चालवून, चुकीच्या दिशेला जावून मयत चालवित असलेल्या कारला धडक दिली. त्या अपघातामध्ये गौरव सुभाष गाडेकर हा गंभीररित्या जखमी होवून मयत झाला. अपघाताचे वेळी सदर बस सामनेवाला क्र.२ एस.टी. महामंडळ यांच्या मालकीची होती. अर्जदाराने येणेप्रमाणे झालेल्या अपघाताबाबत सामनेवालाकडून नुकसान भरपाईची मागणी केलेली आहे.

३. सामनेवाला क्र.२ यांनी नि.१९ प्रमाणे म्हणणे दिलेले आहे. सामनेवाला क्र.१ यांनी सामनेवाला क्र.२ यांचे म्हणणे स्वीकारल्याबाबत निशाणी २० प्रमाणे पुरशीस दाखल केली आहे.

४. अर्जदारांनी यादी नि.४ सोबत हजर केलेले अपघातासंबंधीचे कराड शहर पोलीस ठाणे मधील दि.२२.११.२०१८ रोजी नोंदविलेल्या गु.र.क्र.८७८/२०१८ मधील प्रथम वर्दि अहवाल आणि घटनास्थळ पंचनाम्यावरुन अर्जदारांच्या कथनाप्रमाणे वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी अपघात झाल्याचे आणि सदरहू वाहने त्या अपघातात सामील असल्याचे सकृतदर्शनी स्पष्ट होते. सदर अपघाताबाबत पोलीसांनी वर नमुद एस.टी. चालकाचे विरुध्द गुन्ह्याची नोंद केलेली आहे.

५. अर्जदार यांनी हजर केलेले शव विच्छेदन अहवाल व मरणोत्तर पंचनामा

यावरुन असे स्पष्ट होते की, गौरव सुभाष गाडेकर यांचा अपघातामध्ये गंभीर जखमी झाल्यामुळे मृत्यू झालेला आहे. वरील सर्व परिस्थितीत अर्जदार हे कलम १४० अन्वये अंतरिम नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहेत आणि सामनेवाला हे सदर नुकसान भरपाई देण्यास जबाबदार आहेत. सबब, खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

**आ दे श**

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. सामनेवाला यांनी नुकसान भरपाई म्हणून रक्कम रु.५०,०००/- (रु. पन्नास हजार फक्त) या आदेशापासून ३० दिवसांचे आत अर्जदार यांना रेखांकित धनादेशाद्वारे द्यावेत. त्यापैकी अर्जदार क्र.१ व २ यांना प्रत्येकी रक्कम रु.२५,०००/- (रु.पंचवीस हजार फक्त) रेखांकित धनादेशाद्वारे देण्यात यावेत. सदरहू रक्कम मुदतीत न दिल्यास त्यावर अर्ज दाखल तारखेपासून संपूर्ण रक्कम फिटेपर्यंत द.सा.द.शे.७.५ टक्के दराने व्याज देण्यास सामनेवाला जबाबदार राहतील.

३. येणेप्रमाणे अंतरिम निवाडा करण्यात यावा.

सातारा
दिनांकः ०७.०१.२०२०

( राजेंद्र द. सावंत )
अध्यक्ष, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण
सातारा.